

# साहाय्य आणि संस्कारातून घडे स्वयंपूर्णता, मंत्र करु सार्थ हा समाज उन्नतीचा!



- शिक्षण
- ग्रामविकास
- ग्रामआरोग्य
- ग्राम-नगर संगम

विद्या विकासेन शोभते

# तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास


नोंदणी क्र.: ई/१३६९/पुणे/३०.०७.१९९०

मु.पो. वेल्हे, जि. पुणे ४१२ २१२, महाराष्ट्र (भारत). दूरध्वनी: ०२१३०-२२१४५०

ई-मेल: toranarajgadnyas@gmail.com वेबसाईट: www.toranarajgadnyas.org




# तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास, वेल्हे

रा. स्व. संघाच्या प्रेरणेतून १९८६ सालापासून **'विद्या विकासेन शोभते'** या ब्रीदवाक्याचे तंतोतंत पालन करून शिक्षणाच्या आधारे ग्रामविकास साधण्याचा प्रयत्न न्यासाच्या माध्यमातून वेल्हे परिसरातील अतिदुर्गम भागामध्ये चालू आहे.

शिक्षण – ग्रामआरोग्य – ग्रामविकास – ग्राम–नगरसंगम या चतु:सुत्रीच्या आधारावर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांना संघटित करुन **राष्ट्र आराधनाचे** कार्य करीत आहे. या सर्व परिसरामध्ये शिक्षणाचा प्रसार करुन पुढील पिढीमध्ये चारित्र्य, शिस्त, सामाजिक बांधिलकी हे सर्व गुण रुजवून सामाजिक सलोख्याचे आणि जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण करण्यात न्यासाला यश मिळाले आहे.

परिसरातील गरीब, अनाथ विद्यार्थ्यांसाठी स्थापन केलेले सर्वश्रुत असे मुलांचे वसतिगृह हा तर एक जिव्हाळ्याचा विषय बनला आहे. विद्यार्थ्यांबरोबरच मुलींसाठी सुद्धा घर ते शाळा मोफत वाहन व्यवस्था सुरु करुन न्यासाने दुर्गम भागातील मुलींच्या शिक्षणाचा मार्ग सुकर केला आहे. याचबरोबर ग्रामआरोग्य राखण्यासाठी आरोग्यरक्षक, पशुवैद्यकीय शिबिरे, महिला बचत गट, व्यवसाय प्रशिक्षण असे सर्वांगीण विकासासाठी आवश्यक प्रकल्प कोणत्याही सरकारी अनुदानाशिवाय न्यासातर्फे चालविले जातात. नगरवासी आणि ग्रामवासी यामधील दुवा होऊन त्यांच्या एकत्रीकरणाचे अनेक उपक्रम न्यासातर्फे राबवले जातात. यातून निर्माण होणाऱ्या आपुलकीतून ग्रामविकासाची अनेक कामे तत्पर मार्गी लागतात.



अशा अनेक प्रकल्पांच्या माध्यमातून राष्ट्र आराधनाचा प्रयत्न तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास करीत आहे त्यास जोड हवी आपल्या उस्फूर्त पाठिंब्याची आणि प्रेमाची!



# शिक्षण

## तोरणा विद्यार्थी वसतिगृह







न्यासाचे वतीने १९८६ सालापासून वेल्हे येथे गरजू-होतकरु विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह चालविण्यात येत आहे. न्यासाच्या धोरणानुसार प्राधान्याने भोर-वेल्हे या दुर्गम भागातील जेथे शाळेची सुविधा नाही, अशा गावांतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो.

काही विद्यार्थी पुणे जिल्ह्यातील इतर तालुक्यांतील व गावातीलही असतात.

कोणत्याही जाती, पंथ, धर्मातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. वसतिगृहामध्ये ठरलेल्या दिनचर्येप्रमाणे काम चालते. वसतिगृहात सण, समारंभ, उत्सव, विशेष दिनांचे आयोजन केले जाते.

विद्यार्थ्यांवर राष्ट्रीय संस्कार व्हावेत, त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा, ते पुढे आदर्श नागरिक व्हावेत यासाठी प्रयत्न केले जातात. वसतिगृहातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती उत्तम होण्यासाठीही प्रयत्न केले जातात.

# ग्रामविकास








अतिवृष्टी तरीही पाण्याचे दुर्भिक्ष असलेल्या या भागात खरी गरज आहे ती ग्रामविकासाची. ग्रामविकासाचे मोठे उद्दिष्ट समोर ठेऊन ग्रामसभा, सरपंच परिषद याचे आयोजन केले जाते. ग्रामस्थांच्या गरजा व उपाय यावर चर्चा केली जाते.

या प्रयत्नातून **विहिरी बांधणे, बंधारे बांधणे, शेततळी खोलीकरण, रस्ते बांधणे, डोंगरउतारावरील जमिनीचे सपाटीकरण करून शेतीखाली आणणे** अशी अनेक कामे न्यासातर्फे केली जातात.

न्यासाने केलेल्या सर्वेक्षणानुसार सर्वात प्रतिकूल परिस्थिती असलेल्या गावांना प्राधान्य दिले जाते. या पैकी काही ठळक उपक्रम म्हणजे **'घिसर', 'गुहिणी', 'खुलशी', 'निगडे', 'कुंबळे', 'वाघमाची', 'मेटपिलावरे', 'चांदवणे', 'दामगुडा आसनी', 'वडगाव झांझे' आणि 'पाबे'** अशा अनेक गावास विहिरी बांधून देण्यात न्यासाला यश आले आहे. यामुळे या गावांतील पाण्याचे दुर्भिक्ष संपुष्टात आले आहे.

रस्ते, वीज यासारख्या मूलभूत सुविधाही अनेक गावांमध्ये नाहीत. शासकीय यंत्रणांकडे पाठपुरावा करुन काही गावांचे रस्त्यांचे प्रश्न सोडविण्यात न्यासाला यश आले आहे.

# विद्यार्थिनी शालेय वाहतूक व्यवस्था



गेली अनेक वर्षे वेल्हा आणि भोर तालुक्यातील अतिदुर्गम भागातील गरजू विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रवृत्त करण्याचे कार्य न्यासातर्फे सुरू आहे. मुलींच्या शिक्षणात येणारे अडथळे म्हणजेच शाळेचे घरापासून असलेले अंतर व दळणवळणाच्या सोयींचा अभाव यावर तोडगा काढण्यात आला.



या गरजू मुलींना मोफत शालेय वाहतूक व्यवस्था पुरवून त्यांच्या शालेय शिक्षणाचा प्रश्न न्यासानी सोडवला आहे. सुरुवातीला काही वर्षे मिनीबसद्वारे विद्यार्थिनींसाठी वाहतूक व्यवस्था न्यासातर्फे पुरविण्यात आली होती.

या सत्पात्र कार्याची दखल घेतली जाऊन न्यासाला सीएसआर च्या माध्यमातून दोन मोठ्या बस प्राप्त झाल्या आहेत. या दोन बसपैकी एक बस शालेय विद्यार्थिनींची वाहतूक करते आणि दुसरी बस महाविद्यालयीन विद्यार्थिनींची वाहतूक करते. न्यासाने सुरु केलेल्या ह्या दुसऱ्या बसमुळे आपले शिक्षण दहावीनंतर न थांबवता महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करण्याचे मुलींचे स्वप्न पूर्ण होत आहे.



# रोजगार निर्मितीतून महिला सबलीकरण



या भागात पाणी साठवणूक नसल्याने, कोणतेही दुबार पिक घेऊ शकत नाही. त्यामुळे येथील पुरुष शहरी भागात मोलमजुरीसाठी विस्थापित होतात.

येथील महिलांना त्यांच्या घरी राहून काही रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी काही व्यवसाय प्रशिक्षण न्यासातर्फे दिले जाते.



**कुकटपालन, गोधडी-पिशव्या शिलाई, करवंद लोणचे, हातसडीचा तांदूळ** याचे प्रशिक्षण देऊन प्रत्यक्ष रोजगार उपलब्ध करुन दिला जातो.

कुकुट पालन प्रकल्पांतर्गत प्रत्येक साधारणपणे १० शेतकऱ्यांची निवड करून त्यांना प्रत्येकी २५ पक्षी देण्यात येतात. शेतकरी महिलांना कुकुट पालनाचे प्रशिक्षण देण्यात येते. त्यांना मदतनीस किंवा मार्गदर्शक म्हणून संस्थेतर्फे एका प्रशिक्षित कार्यकर्त्याची नेमणूक केली जाते. शेतकरी महिला आपल्या घरच्या घरी राहून रोजगाराचा फायदा घेऊ शकतात व आपला चरितार्थ अधिक चांगल्या पद्धतीने चालवू शकतात.



# बीएमसीसी सॅटेलाईट केंद्र
## BMCC SATELLITE CENTRE

न्यासाने आतापर्यंत केलेले गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी शिक्षणासाठीचे प्रयत्न आता फलद्रूप होणार आहेत. बृहन महाराष्ट्र कॉलेज ऑफ कॉमर्स (BMCC) या महाविद्यालया -तर्फे एक शैक्षणिक केंद्र तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यास, वेल्हे येथे लवकरच सुरु होत आहे. यामुळे या दुर्गम भागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना थेट बीएमसीसीच्या प्राध्यापकांकडून मार्गदर्शन व शिक्षण मिळणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे अनेक प्रमाणपत्र अभ्यासक्रम मिळणार आहेत.



# ग्रामआरोग्य

## आरोग्य रक्षक योजना :

वेल्ह्यापासून दूर असलेल्या गावांमध्ये आरोग्याची व दवाखान्याची कुठलीही सोय उपलब्ध नाही.गावातील लोकांना प्राथमिक उपचाराची सोय उपलब्ध व्हावी या उद्देशातून गावातील शिकलेल्या तरूणाला प्रशिक्षण देवून एक प्राथमिक आरोग्य पेटी आणि औषधे पुरविण्यात येतात.




रात्री अपरात्री विनामूल्य सेवा रुग्णाला मिळते.

## पशू वैद्यकीय शिबिर :

या भागातील पशुधनाचे संवर्धन करण्यासाठी वेळोवेळी सरकारी अथवा खासगी पशुवैद्यांकडून पशू आरोग्यचिकित्सा शिबिरे घेतली जातात.

# ग्राम-नगर संगम

या भागातील गरजू ग्रामस्थांशी शहरी नागरिकांचा प्रत्यक्ष संपर्क घडवून आणण्याचा प्रयत्न कायमच न्यासातर्फे केला जातो. या उपक्रमांमुळे **'एकात्म मानवतावाद'** साधून विकास होण्यास मदत होते.

## एकदिवसीय सहल:

'पर्यटनातून सेवादर्शन' ह्या हेतूने पुणे-वेल्हा-पुणे अशी सहल **'ना-नफा'** तत्वावर न्यासातर्फे वर्षभर आयोजित केली जाते.

**माफक मूल्य** घेऊन साधारणपणे १४-२०-३२-५० अशा संख्येच्या बस आयोजित केल्या जातात.

सकाळी ७ वा. पुण्याहून प्रस्थान - कोंढणपूर देवी दर्शन - केतकावळे बालाजी दर्शन - बनेश्वर दर्शन - चहा, न्याहरी - वेल्हा वसतीगृह माहिती -मुलांशी संवाद - भोजन - मढेघाट पर्यटन (पर्यायी) - चहा - सायं ७ वा. पुणे येथे परत असे स्वरुप या सहलीचे असते. संस्थेचा एक कार्यकर्ता बसमध्ये असतो.

## श्रमदानातून कृषिपर्यटन :

मनुष्यबळाची कमतरता व मजुरीची वाढीव मागणी अशा अडचणींना बळीराजा तोंड देत असतो. न्यासातर्फे सत्पात्र शेतकऱ्यांची निवड करुन त्यांच्या खाचरात शहरी बांधवांकडून भातलावणी आयोजित केली जाते. **गुडघाभर चिखलातील मनमुराद आनंद व श्रमदानातून मदतीचे केल्याचे समाधान** मिळते.



## जवळच्या भविष्यात समाजोन्नती साधण्याच्या न्यासाच्या नियोजनातील एक महत्त्वाचे पाऊल...

## बहुउद्देशीय इमारत



वेल्हे परिसराला अधिकाधिक सक्षम करण्यासाठी **व्यवसाय प्रशिक्षण केंद्र, ग्रामविकास, १५० विद्यार्थी संख्येचे वसतिगृह, ग्रामस्थांसाठी आवश्यक असलेली शासकीय माहिती उपलब्ध करून देणारे सुविधा केंद्र, कृषी विषयक नवनवीन योजना व महिला सबलीकरणातील प्रकल्प** असा बहुआयामी आराखडा राबवण्यासाठी युक्त अशा नूतन इमारतीचे बांधकाम न्यासाने सुरु केले आहे. सदर इमारतीचे उद्घाटन श्रद्धेय श्री. भैय्याजी जोशी, सरकार्यवाह, रा. स्व. संघ यांच्या हस्ते झाले आहे.

## निधी आवाहन:

सदर प्रकल्पाला प्रचंड प्रमाणात खर्च येणार आहे. न्यासाने एकप्रकारे शिवधनुष्यच उचलले आहे.

आपल्या सर्वांचा हा महत्वाकांक्षी प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होवून या भागाच्या समाजोन्नतीची स्वप्ने साकार व्हावीत यासाठी आपल्यामार्फत न्यासाला जास्तीत जास्त देणगी मिळावी, ही विनंती.





**प्रत्यक्ष बांधकामाचे छायाचित्र**








अतिशय खर्चिक परंतु, मुलींच्या शिक्षणासाठी अतिशय आवश्यक असा हा प्रकल्प.... **विद्यार्थिनी मोफत शालेय वाहतूक !** कोणतेही शासकीय अनुदान नसल्यामुळे आपल्यासारख्या दानशूर व्यक्ती व संस्था यांच्या देणगीतूनच हे कार्य चालते. तरी खाली दिलेल्या खर्चाचा आपण विचार करुन आपल्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत न्यासाला मिळवून द्यावी, ही विनंती.

**मासिक खर्च :** बस क्र १. व २. रु. ७००००/– (प्रत्येकी) **एकूण : रु १.४० लाख**

## देणगीदारांसाठीच्या विविध संधी

| | | |
|---|---|---|
| १. | वार्षिक शैक्षणिक साहित्य खर्च (प्रति विद्यार्थी) | रु. ४००/- |
| २. | एका विद्यार्थ्याचा गणवेश | रु. ६००/- |
| ३. | महिनाभराचा प्रशिक्षण वर्गः (प्रति विद्यार्थी) | रु. १,३००/- |
| ४. | अन्नपूर्णा योजना (प्रतिदिन) | रु. १,५००/- |
| ५. | विद्यार्थ्यांचे एक वेळचे जेवण | रु. ३,०००/- |
| ६. | वसतिगृहाचा एक दिवसाचा खर्च | रु. ६,०००/ |
| ७. | विद्यार्थी औषध योजना (प्रतिवर्ष) | रु. १२,०००/- |
| ८. | विद्यार्थी स्पर्धा निधी (प्रतिवर्ष) | रु. १५,०००/- |
| ९. | विद्यार्थी उच्चशिक्षण योजना (प्रतिवर्ष) | रु. ४८,०००/- |
| १०. | उद्योजकता प्रशिक्षण वर्ग खर्च | रु. २५,०००/- |
| ११. | महिन्याचा किराणा धान्यासह खर्च | रु. ३०,०००/- |
| १२. | वार्षिक सहल | रु. ६०,०००/- |
| १३. | प्रशिक्षण वर्गः प्रवासाचा खर्च | रु. ६०,०००/- |
| १४. | ग्राम आरोग्यविकास योजना वार्षिक खर्च | रु १ लाख/- |
| १५. | महिन्याचा वसतिगृहाचा खर्च | रु १.५० लाख/- |

**80 G**

न्यासास मिळणाऱ्या देणग्या आयकराच्या ८० जी कलमाखाली सवलतीस पात्र आहेत. चेक वा ड्राफ्ट **'तोरणा-राजगड परिसर समाजोन्नती न्यास'** या नावे काढावा. देणगी देताना आपला पॅन देणे आवश्यक आहे.

**बँक खात्याचा तपशील**

- **Account Name:** Torana Rajgad Parisar Samajonnati Nyas
- **Bank Name:** Bank of Maharashtra
- **Bank Branch :** Tilak Road Pune
- **Account Number :** 60007119478
- **IFSC:** MAHB0000041
- ऑनलाईन पैसे ट्रान्सफर करताना **NEFT/RTGS** ने करावेत. **IMPS** करु नये.

## पुरस्कार





चरैवेति...... चरैवेति या उक्तीप्रमाणे अविरतपणे न्यासाचे कार्य चालू आहे. कोणत्याही आव्हानांपुढे न झुकता, धीरोदात्तपणे पुढे जात अनेक महत्वाकांक्षी प्रकल्प न्यासाने उभे केले आहेत. पारदर्शकता, सचोटी आणि निग्रहपूर्ण कार्यशैलीमुळे अनेक सीएसआर कंपन्या, सामाजिक संघटना यांचा विश्वास न्यासाने संपादित केला आहे. याची पावती म्हणूनच की काय... न्यासाला आता पुरस्कारही मिळत आहेत. न्यासाचे कार्यकर्ते, देणगीदार, हितचिंतक यांच्यासाठी ही बाब आनंदाची व अभिमानाची आहे.

**जनसेवा पुरस्कार २०२१ -** जनसेवा सहकारी बँक लि. हडपसर, पुणे या बँकेतर्फे दरवर्षी सेवासंस्थांसाठी देण्यात येणार 'जनसेवा पुरस्कार' या वर्षी न्यासला प्राप्त झाला आहे.

**समर्थ गौरव पुरस्कार -** पुण्यातील प्रख्यात समर्थ प्रतिष्ठान या समाजसेवी संस्थेतर्फे १३ वा समर्थ गौरव पुरस्कार तोरणा राजगड परिसर समाजोन्नती न्यासाला देण्यात आला.

## कार्यक्षेत्र




### (CSR सहयोगी)

PERSISTENT FOUNDATION | BAJAJ FINSERV | NTT DATA | MITCON | KPIT | KALYANI TECHNOFORGE | ARAI | Cognizant

### (विश्वस्त मंडळ)

**उमेश देशपांडे–पुणे**
मो. ९८२२०८०२१४
**रमेश आंबेकर–वेल्हे**
मो.९४२१०५१८२२
**उदय पुरंदरे–शिवापूर**
मो.९९२१०९६९०५,

**प्रकाश मीठभाकरे–चिंचवड**
मो.९७३००३३६४७,
**प्रमोद खळदकर–सासवड**
मो.९८२२४०८७९१,
**सुनिल देशपांडे–सासवड**
मो.९८२२४०८७९२,

**मंदार अत्रे–पुणे**
मो.९४२२००८०६८
**मनोहर कोकाटे–भट्टी**
मो.९८८१५७२४९२,
**मारुती भूरुक–शेनवड**

### (निधी संकलक)

**उल्हास सावळेकर** ८९७५७८९३५०
**हरीओम मालशे** ९६०४४४१३०२
**धनाजी जाधव** ९५९४९९३८३४
**आप्पा नित्सुरे** ९८८११३२९०४

**हरी गोखले** ९८५०१३३५६३
**विश्वास बागूल** ९७६७२९०७०२
**दादा दबडघाव** ९८५०८४९८६७
**अनंत कुलकर्णी** ९७६३२३८६९९

**रवी फडके** ०२०–२४२१९३१६
**शांताराम बढे** ९६५७०७२८४२
**चंद्रशेखर मुसोळगी** ७२७६१८९५६६
**सुरेश कुलकर्णी** ८२३७८२६७६६